# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

गोरेगाव (टोपीवाला) प्रसुतिगृह, गोरेगाव (पश्चिम)

**जाहिरात क्र. एचओ/156/जीएमएच दि.25.06.2026**

**विषयः-** पी/दक्षिण विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत गोरेगाव (टोपीवाला) महानगरपालिका प्रसुतिगृह येथे 02 खाजगी सोनोलॉजिस्ट पॅनलवर निवड करण्याबाबत...

पी/दक्षिण विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत गोरेगाव महानगरपालिका प्रसुतिगृह, गोरेगाव (पश्चिम) येथील आंतररूग्णांच्या सोनोग्राफी करिता खाजगी सोनोलॉजिस्ट यांची पॅनलवर निवड करण्याकरिता इच्छूक **सोनोलॉजिस्ट** यांची परिपत्रक क्र. एचओ / १९८१६ / आस्था.-२ दि. १३.१२.२०२५ अन्वये खाली नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच अटी व शर्तीनुसार दि. 26.06.2026 शुक्रवार ते दि. 08.07.2026 गुरूवार पर्यंत (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 5.00 वा. पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता**

1. उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी / पदविका / डीएनबी धारण करणारा असावा.
2. पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर १ वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा.
3. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र तसेच नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
4. अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र मॅडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र / नुतणीकरण आवश्यक.

**सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती**

1. सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांची **वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत राहिल.**
2. प्रत्येक प्रसूतिगृहात सोनोलॉजिस्ट पॅनेलमध्ये कमीत कमी दोन तज्ञांची निवड केली जाईल.
3. सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांना चक्रांकीत पध्दतीने सोनोग्राफी करिता बोलाविण्यात येईल.
4. **सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे प्रसूतिगृह / रूग्णालयापासून शक्यतो जवळ असावे.**
5. पॅनलवर सोनोलॉजिस्ट तज्ञांची निवड करण्याचे अंतिम निर्णय हे मान. कार्यकारी आरोग्य अधिकारी कार्यालय, सार्वजनिक आरोग्य खाते यांचे राहील.

## **सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांना देण्यात येणा-या सुधारित दराचा तपशिल**

| सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांना मानधनाचा तक्ता | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **सुविधेचे नाव** | **प्रस्तावित मानधन** |
| **1.** | **सोनोलॉजिस्ट सेवा (सर्वसाधारण सोनोलॉजी)** | **प्रत्येक सोनोग्राफीकरिता रु.250/-** |
| **2.** | **सोनोलॉजिस्ट सेवा (अनमोली स्कॅन/ कलर डॉपलर/ 2 डी एको)** | **प्रत्येक स्कॅन करिता रु.500/-** |

उपरोक्त नमूद अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छूक **सोनोलॉजिस्ट** यांनी वैद्यकीय अधिकारी (प्रभारी), गोरेगाव (टोपीवाला) महानगरपालिका प्रसुतिगृह, लॉर्डस कॉलेज समोर, स्टेशन रोड, गारेगाव (पश्चिम), मुंबई - 400104 यांच्या नावे स्वहस्ताक्षरात आपले अर्ज व सहकागदपत्रे गोरेगाव महानगरपालिका प्रसुतिगृह, गोरेगाव (पश्चिम) कार्यालयात दि. 26.06.2026 शुक्रवार ते दि. 08.07.2026 बुधवार पर्यंत (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनक सुट्टी वगळून) सकाळी 10.00 वा. ते सायंकाळी 05.00 वा. पर्यंत पोचतील याची दक्षता घ्यावी.

सही/- 25.06.2026
वैद्यकीय अधिकारी (प्रभारी)
गोरेगाव महानगरपालिका प्रसुतिगृह,
गोरेगाव (पश्चिम)